जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2024
सकाळ



कोल्हापूर : येथे कोल्हापूर-लंडन प्रवास करत पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या चौघांचा अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्या हस्ते सत्कार झाला. याप्रसंगी कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे व मान्यवर उपस्थित होते.

# कोल्हापूर-लंडन प्रवास पुढील पिढीसाठी प्रेरणादायी

## अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी : गौरव समितीतर्फे सत्कार

गोकुळ शिरगाव, ता. १७ : 'उद्योगपती हेमंतभाई शहा, मदन भंडारी व प्रताप कोंडेकर आणि सुधीर बोरा यांनी कोल्हापूर ते लंडन हा प्रवास पर्यावरण रक्षणाचा संदेश देत केला. त्यांचा प्रवास भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल,' असे गौरवोद्गार अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी यांनी काढले. गौरव समितीतर्फे चौघांचा सत्कार स्वामीजींच्या हस्ते झाला.

अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे, प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, उद्योजक शंकर पाटील, पाटबंधारे विभागाचे निवृत्त संचालक खलील अन्सारी, उद्योजक अरुणकुमार गोयंका यांची उपस्थिती होती. कुलगुरू कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'इच्छाशक्तीच्या जोरावरच चौघांनी प्रवास पूर्ण केला. त्यांनी पर्यावरण संरक्षणाचा नारा पोहोचवून जागृती केली आहे. त्यांच्या कार्याची दखल पुस्तकरूपाने यावी.'' यावेळी चौघांनी अनुभव कथन करताना नेपाळ उझबेकिस्तान, किर्गिस्तान, तुर्कस्तान, रशिया, जॉर्जिया, बल्गेरिया, सर्बिया, हंगेरी, झेक रिपब्लिक, बेल्जियम, युनायटेड किंगडम, ग्रीस, लंडन असा २० देशांचा प्रवास केल्याचे सांगितले. पर्यावरणाचे रक्षण करा, पाणी वाचवा निसर्ग वाचवा असा संदेश दिला. याप्रसंगी प्रवासाची अनिकेत कोंडेकर निर्मित डॉक्युमेंट्री दाखविली. आयोजन राजीव लिंग्रज, डॉ. संदीप पाटील, डी. सी. पाटील यांच्यासह गौरव समितीने केले. कार्यक्रमाला उद्योजक, बांधकाम व्यावसायिक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2024
सकाळ

# योग्य नियोजनातून कमी खर्चात लघुपट शक्य

## पाटील; 'मधुबाला' लघुपटाचे स्क्रिनिंग

कोल्हापूर, ता. १७ : लघुपटासाठी खूप जास्त बजेट लागत नाही. अत्यंत कमी खर्चामध्ये लघुपट निर्मिती शक्य आहे. यासाठी उत्तम नियोजन आणि आपल्याकडे असलेल्या संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करायला हवा, असे मत दिग्दर्शक स्वप्निल पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाअंतर्गत बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'मधुबाला' लघुपटाचे स्क्रिनिंग करण्यात आले. त्यांनी लघुपटासंदर्भात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. लघुपटाची प्रक्रिया नेमकी कशी होती, ते उलगडून सांगितले. बी. ए. फिल्म मेकिंगचे



स्वप्निल पाटील

समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सची माहिती दिली. विद्यापीठाने बारावीनंतर तीन वर्षांचा पूर्ण वेळ चित्रपटाशी संबंधित अभ्यासक्रम सुरू केला आहे. तीन वर्षांत शास्त्रीय पद्धतीने फिल्म मेकिंगचे शिक्षण दिले जाईल. कमी शुल्कमध्ये विद्यार्थ्यांना नव्या गोष्टी शिकता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. सुमेधा साळुंखे, विराज कुलकर्णी, मल्हार जोशी, आकाश बोकमुरकर उपस्थित होते. गौतमी शिकलगार यांनी सूत्रसंचालन केले. साजिद पिरजादे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाची दुसऱ्यांदा पुनर्प्रवेश परीक्षा

कोल्हापूर, ता. १७ : पदवी आणि पदव्युत्तर विविध २४ अभ्यासक्रमांच्या रिक्त राहिलेल्या जागांसाठी शिवाजी विद्यापीठातर्फे २९ जुलैला तंत्रज्ञान अधिविभागात पुनर्प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. दुसऱ्यांदा विद्यापीठाकडून प्रवेश परीक्षा होणार आहे.

विविध २६ अभ्यासक्रमांसाठी १६ ते १९ मे दरम्यान प्रवेश परीक्षा घेतली होती. ही परीक्षा ४९०५ विद्यार्थ्यांनी दिली होती. त्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी विद्यापीठाने २८ जूनला पुनर्प्रवेश परीक्षा घेतली. त्यानंतरही विविध २४ अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहिलेल्या आहेत. त्यासाठी आता पुन्हा दुसऱ्यांदा पुनर्प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जाची मुदत २४ जुलैपर्यंत आहे. फक्त एकाच अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 JUL 2024
तरुण भारत

# रिक्त जागांसाठी २९ जुलैला पुनप्रविश परीक्षा

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयात रिक्त राहिलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या जागेसाठी २९ जुलै रोजी पुनप्रविश परीक्षा घेण्यात येणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी १७ ते २४ जुलै दरम्यान ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. एम. एस्सी, एम. ए., एम. बी. ए., एम. ए. मास कम्युनिकेशन यासह अन्य २४ विषयांसाठी ही परीक्षा घेण्यात येणार आहे.या परीक्षेसंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2024

सकाळ

# डीआरके कॉमर्स कॉलेजला विज्ञान अभ्यासक्रमांना मान्यता

कोल्हापूर : कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (डीआरके) मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी.एस्सी. केमिस्ट्री आणि बी.एस्सी. स्टॅटिस्टिक्स या विषयांच्या पदवी अभ्यासक्रमांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाची मान्यता मिळाल्याची माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. आर. एस. नाईक यांनी दिली. वाणिज्य शाखेतील पदवी, पदव्युत्तर शिक्षण, एमबीए, बीबीए, बीसीए या अभ्यासक्रमांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देत असून विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम राबविण्यात येत असतात. वाणिज्य शाखेबरोबरच विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेची पदवी घेण्याची संधी महाविद्यालयाने दिली आहे. या अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य ॲड. अमित बाडकर, वैभव पेडणेकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन डॉ. नाईक यांनी केले आहे.

18 JUL 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योजकांनी नवतंत्रज्ञान आत्मसात करावे

## प्रा. सपली : थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञान दागिने निर्मिती कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

हुपरी, ता. १७ : सोने-चांदी उद्योजकांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. पारंपरिक पद्धती, तसेच ग्राहकांच्या मागणीप्रमाणे दागिने घडवताना त्यास थ्रीडी प्रिंटिंग व कॅड कॅम तंत्रज्ञानाची जोड दिल्यास उद्योजकांना निश्चित फायदा होईल, असे शिवाजी विद्यापीठाचे तंत्रज्ञान अधिविभाग संचालक प्रा. डॉ. शिवलिंगप्पा सपली यांनी सांगितले.

हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाउंडेशन व शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातर्फे आयोजित थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाने दागिने निर्मिती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. चांदी फाउंडेशनचे संचालक ॲड. जितेंद्र देशमुख,



शामराव शिंदे, विलासराव जाधव, अजित पाटील, संदीप अडसुळे आदी उपस्थित होते.

कॅड कॅम तंत्रातील ज्वेलरी डिझाईन तज्ज्ञ सुहास हजारे यांनी सोन्या-चांदीच्या विविध डिझाईन बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. तेजस माफनकर यांनी थ्रीडी प्रिंटरची गुणवत्तेची माहिती दिली.

प्रा. डॉ. सखाराम पाटील यांनी विद्यापीठात मोफत शिकविल्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ज्वेलरी डिझाईन कार्यशाळेप्रसंगी सुहास हजारे यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. शिवलिंगप्पा सपली. शेजारी मोहन खोत, डॉ. अजित कोळेकर, डॉ. एन. सी. माळी आदी.

जाणाऱ्या कॅड कॅम तंत्राच्या विविध कोर्सविषयी माहिती दिली. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाचे संचालक प्रा. डॉ. एन. सी. माळी, प्रा. सुधीर देसाई यांचेही मार्गदर्शन झाले. स्वागत प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी केले. फाउंडेशनचे अध्यक्ष मोहन खोत यांनी कार्यशाळा मागील उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन प्रा. एस. बी. काळे यांनी केले. आभार प्रा. डॉ. वैशाली भोसले यांनी मानले.